# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक ०७/०३/२०२५ (शुक्रवार)

---

## सराईत गुन्हेगार शशिकांत उर्फ सचिन बाळकृष्ण गोलाईत याला एमपीडीए कायदया अंतर्गत केले स्थानबध्द

पोलीस स्टेशन केळवद अंतर्गत राहणारा सराईत आरोपी **नामे शशिकांत उर्फ सचिन बाळकृष्ण गोलाईत ,वय ४८ वर्षे, रा वार्ड क्र २ कपीलेश्वर मंदीर रोड, केळवद** हा केळवद परीसरात गुंडगिरी करून खुनाचा प्रयत्न, दुखापत, अवैध दारू या सारखे अनेक गंभीर गुन्हे करण्याच्या सवयीचा आहे. त्याच्या असमाजिक कृत्याची माहीती पोलीसांना देणाऱ्या लोकांमध्ये तो भय निर्माण करून दहशत पसरवित असतो. नागपुर ग्रामीण पोलीसांना त्याचेविरूध्द जेव्हा जेव्हा तक्रारी प्राप्त झाल्या त्या त्या वेळी गंभीर दखल घेवुन त्याचे विरूध्द गुन्हे नोंद केले व त्याला अटक केले आहे. आरोपी नामे **श**शिकांत उर्फ सचिन बाळकृष्ण गोलाईत याचे गुन्हेगारी कृत्यांवर नियंत्रण ठेवण्याकरीता वेळोवेळी त्याचेवर प्रतिबंधक कार्यवाही सुध्दा केली आहे.परंतु आरोपी नामे **श**शिकांत उर्फ सचिन बाळकृष्ण गोलाईत याने आपली गुन्हेगारी गतिविधी निरंतर सुरूच ठेवली. आरोपीचे कृत्य समाजिक सुव्यवस्थेला बाधक ठरत असल्याने मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक,नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनाखाली केळवद पोलीसांकडुन एमपीडीए कायदयान्वये कार्यवाही करण्यात आली. दिनांक ०६/०३/२०२५ रोजी मा. जिल्हाधिकारी ,नागपुर यांनी सराईत गुन्हेगार **श**शिकांत उर्फ सचिन बाळकृष्ण गोलाईत , वय ४८ वर्षे, रा वार्ड क्र २ कपीलेश्वर मंदीर रोड, केळवद याचे विरूध्द स्थानबध्दतेता आदेश परीत केला त्यात आरोपीला मध्यवर्ती कारागृह येरवडा येथे दाखल करण्याचे आदेशीत केले आहे. केळवद पोलीसांनी तात्काळ आरोपीचा शोध घेवुन त्याला तात्पुरत्या स्वरूपात मध्यवर्ती कारागृह नागपुर येथे दाखल केले आहे.



**आरोपी नामे श**शिकांत उर्फ सचिन बाळकृष्ण गोलाईत

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर